**<u>४थे सह दिवाणी न्यायाधीश व अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, कोपरगाव यांचे न्यायालयात</u>**

**<u>(पिठासीन अधिकारी श्री. जान्हवी एस. केळकर)</u>**

**संक्षिप्त फौ.ख.क्र. ९२/२०२४**
**नि.क्र.**

**<u>आरोपीचा तपशिल</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | फिर्याद दाखल दिनांक | : | ३१/०१/२०२४ |
| २. | फिर्यादीचे नाव व पत्ता | : | **सुनिल आसाराम टुपके,**<br>वय – ४० वर्षे, धंदा- शेती,<br>रा. - तळेगाव मळे, ता.कोपरगाव,<br>जि. अहमदनगर. |
| ३. | आरोपीचे नाव,त्याचे वय व | : | **ज्ञानदेव कारभारी जाधव,**<br>वय – सज्ञान, धंदा - शेती,<br>रा. - खोपडी, ता.कोपरगाव,<br>जि. अहमदनगर. |
| ४. | कलम व अधिनियम | : | कलम १३८, परक्राम्य संलेख कायदा १८८१. |
| ५. | गुन्हयाचा तपशिल | : | |

आपण फिर्यादीस कायदेशिर देय रक्कम लागत होता. सदर रकमेच्या परत फेडीपोटी आपण दिनांक ०१/१२/२०२३ रोजीचे स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा - खंदकनाला कोपरगाव या बँकेचा आपले बँक खात्याचा रक्कम रु. ६,००,०००/- चा धनादेश क्रं. २०२६१३ फिर्यादीचे नावाने दिला होता. सदर धनादेश फिर्यादीने त्याचे बँक खाते असलेल्या बँकेत वटविण्यासाठी टाकला असता तो आपले बँकेने आपल्या खात्यात रक्कम अपुर्ण या कारणास्त्व दि. ०४/१२/२०२३ रोजी न वटता परत पाठवला. फिर्यादीस सदर धनादेश वटला नसल्याचे माहिती मिळाल्यानंतर तेथुन पुढे तीस (३०) दिवसात फिर्यादीने आपणास स्वतंत्र लेखी नोटीस दि. १३/१२/२०२३ रोजी पाठवुन

धनादेशाची रक्कम परत मागीतली. सदर नोटीस दि. २३/१२/२०२३ रोजी स्वीकारूनही कायदेशीर पंधरा (१५) दिवसात धनादेशाची रक्कम आपण फिर्यादीस परत केली नाही. अशा त-हेने आपण परक्राम्य संलेख कायदा १८८१ चे कलम १३८ चा गुन्हा केला आहे.

वर नमुद ठेवलेल्या गुन्हयाचा तपशील आरोपी त्याला समजेल अशा भाषेत निवेदित करण्यात आला व त्यानंतर आरोपीस खालील प्रश्न विचारले असता त्याने त्यास खाली नमुद उत्तरे दिली.

प्रश्न १ : आपणास फिर्यादीची व कागदपत्रांच्या प्रती मिळाल्या काय?
उत्तर : होय.

प्रश्न २ : आपणास वर नमुद केलेला व तोंडी वाचुन दाखविलेला गुन्हा/आरोपी समजला काय?
उत्तर : होय.

प्रश्न ३ : आपणास सदरचा गुन्हा कबुल आहे काय?
उत्तर : नाही.

........................
**आरोपी ची सही / अंगठा.**

JANHAVI SHASHANK KELKAR
Digitally signed by JANHAVI SHASHANK KELKAR
Date: 2026.02.16 10:54:45 +0530

**(जान्हवी एस. केळकर)**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
कोपरगाव

दिनांकः-१४/०२/२०२६.